# आरोग्य सेवा संचालनालय
## (महाराष्ट्र राज्य)

| | | |
|---|---|---|
| दुरध्वनी क्रमांक<br>कार्यालय :<br>संचालक (वैयक्तिक):<br>सहसंचालक (रुग्णालये-राज्यस्तर):<br>सहसंचालक (प्रा.आ.केंद्र-जिल्हा परिषदस्तर):<br>सहसंचालक (असंसर्गजन्य रोग): | २२६२१०३१-३६<br><br>२२६२१००६<br>२२६११४७१<br>२२६२०२४९<br>२२६२११८६ | आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय इमारत आवार,<br>पी. डिमेलो रोड, मुंबई ४०० ००१<br>महाराष्ट्र राज्य (भारत).<br>तार : आरोग्य सेवा, मुंबई<br>फॅक्स २२६२०२३४<br>**Website : http://maha-arogya.gov.in** |
| | | पत्र क्र. :संआसे/कु.क./रा.कु.बा.मृ./संनियंत्रण समिती/इतिवृत्त/कक्ष-१५/१०<br>दिनांक : १ एप्रिल २०१० |

प्रति,
अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा,
(सामाजिक बांधिलकी असलेले कार्यक्रम), पुणे.

विषय :- राज्यातील कुपोषित बालकांच्या बालमृत्यु संदर्भात स्थापन करण्यात आलेल्या संनियंत्रण समितीची दहावी सभा दि. २ जानेवारी, २०१० च्या इतिवृत्तास मान्यता देणेबाबत.

संदर्भ :- आपले पत्र क्र. राकुकका/बालमृत्यू संनियंत्रण समिती-इतिवृत्त/ कक्ष-१०(अ)/नस्ती क्र. ६५/४७८७/२०१०, दि. १८ / २० फेब्रुवारी २०१०.

आपण सादर केलेल्या कुपोषित बालकांच्या बालमृत्यु संदर्भात संनियंत्रण समितीच्या दि. २ जानेवारी २०१० च्या सभेच्या इतिवृत्तात अंशतः बदल करुन याद्वारे इतिवृत्तास मान्यता देण्यात येत आहे. सदर इतिवृत्त सर्व संबंधित संनियंत्रण समितीचे सदस्य तसेच विविध संबंधीत खात्यांचे अपर मुख्य सचिव, सचिव यांना पाठविण्यात यावे. तसेच ज्यांच्याकडून कार्यवाही अपेक्षित आहे त्या सर्व संबंधीत अधिकाऱ्यांना सदर इतिवृत्ताची प्रत देण्यात यावी.

सदर इतिवृत्त संचालनालयाच्या **Website : http://maha-arogya.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे, याची संबंधीतांना कल्पना द्यावी. तसेच सदर इतिवृत्तावरील कार्यवाहीचा अहवाल सर्व संबंधीतांना, संचालनालय आणि अतिरिक्त संचालकांच्या कार्यालयात तसेच ई-मेल वर देण्याबाबत विनंती करण्यात यावी.

**संचालक आरोग्य सेवा, मुंबई**
**तथा**
**सदस्य सचिव,**
**कुपोषण संनियंत्रण समिती.**

प्रत सादर :- १) मा. अध्यक्ष, कुपोषण संनियंत्रण समिती, संचालक, कॉप्रिहेन्सीव्ह रुरल हेल्थ प्रोजेक्ट, जामखेड, ता. जामखेड, जिल्हा अहमदनगर.
२) मा. सचिव तथा आयुक्त, कुटुंब कल्याण, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

# राज्यातील कुपोषित बालकांच्या बालमृत्युसंदर्भात संनियंत्रण समिती

राज्यातील कुपोषित बालकांच्या बालमृत्युसंदर्भात संनियंत्रण समितीची दहावी सभा डॉ. रजनीकांत आरोळे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २ जानेवारी, २०१० रोजी आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन, मुंबई, येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील समिती सदस्य तसेच विविध विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.

१) श्रीमती वंदना कृष्णा, सचिव तथा आयुक्त (कुटूंब कल्याण)
२) डॉ.रजनीकांत आरोळे, अध्यक्ष, बालमृत्यु संनियंत्रण समिती
३) डॉ.दे.स.डाखुरे, संचालक, आरोग्य सेवा, मुंबई,
४) डॉ.अशोक लढ्ढा, अतिरिक्त संचालक (कु.क.) पुणे
५) श्री.म.प्र.सिंह, सहसचिव, आदिवासी विभाग
६) श्री.ला.रा.गुजर, अवर सचिव, आदिवासी विकास विभाग
७) श्री.वि.पु.काळे, अवर सचिव, नियोजन विभाग,
८) श्री.दशरथ पानमंद, सहाय्यक आयुक्त, टी.डी.डी.नाशिक
९) श्रीमती चंदा जाधव, सहाय्यक आयुक्त ए.बा.वि.से.यो.
१०) डॉ.नरेश गिते, प्रतिनिधी, संचालक,राजमाता जिजाऊ मिशन, औरंगाबाद
११) श्री.भीम रासकर, संचालक, आर.एस.सी.डी.
१२) डॉ.निवास ना.अंभोरे, सहसंचालक, वैदयकिय शिक्षण व संशोधन
१३) डॉ.व्ही.डी.खानंदे, उपसंचालक, कुटूंब कल्याण, पुणे.
१४) डॉ.उमेश वसंत तागडे, सल्लागार, सी.सी.डी.यु. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
१५) श्रीमती डॉ.मृदूला फडके, व्हाईस कॉन्सिलर, एम.यु.एच.एस.
१६) डॉ.शोभा उडिपी, प्राध्यापक व विभाग प्रमुख (न्युट्रिशन) एसएनडीटी वुमन युनिव्हर्सिटी
१७) डॉ.सुहास रानडे, सहा.संचालक, आरोग्य सेवा संचालनालय मुंबई
१८) डॉ.एस.जे.कुलकर्णी, सहाय्यक संचालक (कु.क.) पुणे
१९) डॉ.व्ही.के.रोकडे, सहाय्यक संचालक (कु.क.) पुणे
२०) डॉ.श्रीमती गानू, सहाय्यक संचालक, कुटूंब कल्याण, पुणे.
२१) श्री.हजारी, अन्न व नागरी पुरवठा विभाग
२२) श्रीमती एन.ताम्हणकर, सांख्यिकी अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
२३) श्रीमती वाय.जी. म्हेत्रस, पी.एच.एन. (कु.क.) पुणे.
२४) श्री.र.शि.घाटगे, कार्यासन अधिकारी.
२५) श्रीमती मे.सु.शेलार, कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग

सभेच्या सुरुवातीस डॉ.सुहास रानडे, सहा.संचालक, मुंबई, यांनी काही सदस्य या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याची माहिती समितीचे अध्यक्ष व समितीच्या सदस्यांना दिली व त्यांच्या वतीने सर्वांचे स्वागत करुन सभेस सुरुवात झाली. बैठकीत प्रामुख्याने पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

# राज्यातील कुपोषित बालकांच्या बालमृत्यु संदर्भात संनियंत्रण समितीची सभा
# दिनांक २ जानेवारी २०१०

| अ.क्र. | विषय, झालेली चर्चा व घेण्यात आलेले निर्णय | करावयाची कार्यवाही | जबाबदार अधिकारी |
|---|---|---|---|
| विषय क्रमांक १ | दिनांक १७ सप्टेंबर, २००९ रोजी झालेल्या सभेतील इतिवृत्ताला मान्यता देणे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल | दिनांक १७ सप्टेंबर, २००९ रोजीच्या सभेच्या इतिवृत्तास पुढे नमुद केल्यानुसार चर्चा झाली. | |
| २ | कुपोषण संनियंत्रण समितीचे बहुतांश काम राज्य कुटुंब कल्याण कार्यालय पुणे व संचालक, आरोग्य सेवा मुंबई यांचे मार्फत होते. सदर दोन्ही ठिकाणीच्या उपलब्ध अधिकारी व कर्मचा-यांवर सदरचे अतिरिक्त काम सोपविण्यात आले आहे. समिती सदस्यांनी सुचविलेल्या उपाय योजनावर नियमितपणे पाठपुरावा करणे अपेक्षित आहे यासाठी स्वतंत्र कर्मचारी दोन्ही कार्यालयांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तोपर्यंत डॉ. रानडे , सहाय्यक संचालक, मुंबई हे मुंबई कार्यालयातर्फे समन्वयक म्हणून काम पहातील. | याबाबत दोन्ही कार्यालयात आवश्यक असणारे कर्मचारी व अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीवर नेमणुक करण्याबाबत प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्याऐवजी राज्य शासनाकडे सादर करावा. सन् २०१०-११ च्या पी.आय.पी.मध्ये सदरील पदे व लागणारे अनुदान प्रस्तावित करावे. | अतिरिक्त संचालक कुटुंब कल्याण, पुणे |
| ३ | **अंगणवाडीतील मुलांची तिमाही तपासणी/ ग्रेड ३ व ४ मुलांचा उपचार/ अतिगंभीर मुलांवरील उपचार, नवसंजीवनी आढावा :-**<br>अंगणवाडीतील मुलांची तिमाही तपासणी , ग्रेड ३ व ४ मुलांचा व अतिगंभीर मुलांवरील उपचाराबाबत विस्तृत चर्चा करण्यात आली. जिल्हयातील सर्व अंगणवाडीतील श्रेणी ३ व ४ मधील बालकांची दरमहा तपासणी करणे व आदिवासी क्षेत्रातील सर्व अंगणवाडीतील बालकांची दर १५ दिवसांनी तपासणी करण्याबाबत सर्व जिल्हयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत त्यानुसार पाठपुरावा करावा.<br>अंगणवाडीतील पुरक आहारासाठी पुरेसे अनुदान उपलब्ध होत नाही तसेच, डाळींचे दर वाढल्याने पुरक आहार देण्यात अडचणी निर्माण होतात. यासाठी आयुक्त एकात्मिक बालविकास योजना यांनी अनुदानाऐवजी वस्तुंचा पुरवठा अंगणवाडीस करावा. सोयाबीन, राजगीरा, वरई व नागली यासोबतच डाळ, तांदूळ व गहू पुरविण्याबाबत समिती सदस्य यांनी सूचित केले. | अतिरिक्त संचालकांनी या संबंधीची जिल्हयांकडून प्राप्त माहिती समितीसमोर सादर केली.<br><br>आयुक्त आय.सी.डी.एस. यांचेकडून माहिती मागविण्यात यावी. | अतिरिक्त संचालक ( कु.क.) पुणे<br><br>आयुक्त आय. सी.डी.एस |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | **जिल्हानिहाय अर्भक मृत्यु/बालमृत्यु नोंदणीची स्थिती आणि बालमृत्यु कारणांचे विश्लेषण :-** जिल्हानिहाय अर्भक मृत्यु, बालमृत्यु यासंबंधीची माहिती सादर केली. | या प्रमाणे दर सभेस माहिती सादर करणे. | अतिरिक्त संचालक कु.क. पुणे |
| ५ | **अंगणवाडी, मिनी अंगणवाडी स्थापनेची सद्यस्थिती व गरज :-** सध्या महाराष्ट्रात ८४८५४ अंगणवाडी उपलब्ध आहेत त्यापैकी ८३३६० अंगणवाडी सुरु आहेत, जवळपास १३०० अंगणवाडया या त्या ठिकाणी आमदार अध्यक्ष असल्यामुळे अंगणवाडी कार्यकर्त्याच्या नियुक्तीस विलंब होतो. त्यामुळे बऱ्याच अंगणवाडया कार्यान्वीत होऊ शकल्या नाहीत. तरी याबाबत समितीने प्रशासकिय यंत्रणेमार्फत निवड व्हावी असा प्रस्ताव शासनास सादर करावयाच्या सूचना दिल्या. | याबाबत प्रस्ताव तयार करुन पत्र निर्गमित करावे व आय.सी.डी.एस. विभाग यांना प्रस्ताव सादर करावा. | मा.सचिव, महिलाव बालविकास विभाग व मा. आयुक्त आय. सी.डी.एस. विभाग |
| ६ | अंगणवाडी मुलांची उपस्थिती/वजन घेणे/ कुपोषण सद्यस्थिती (० ते ३ व ३ ते ६ वर्षे वयोगट स्वतंत्ररित्या):० ते ३ वयोगटातील मुलांचे वजन कसे घ्यावे याबर बरीच चर्चा झाली यावेळी सतत मायग्रेशन होणाऱ्या मुलांचे वजन घेणेबाबत चर्चा झाली. त्यावेळी आय. सी.डी.एस. अधिकारी यांनी दोनवेळा बालकास आहार देण्यास सुरुवात केल्यामुळे बालकांची अंगणवाडीमधील उपस्थितीमध्ये सुधारणा झाल्याचे सांगितले | अंगणवाडीतील बालकांच्या उपस्थित वाढीबाबत अहवाल सादर करणेबाबत सूचित करण्यात आले. | मा.आयुक्त, महिलाव बालविकास विभाग |
| ७ | तीन वर्षाच्या आतील मुले अंगणवाडीत येत नाहीत. पाडा स्वयंसेवक, आशा व अंगणवाडी कर्मचारी यांची मदत घेऊन उपस्थिती वाढविण्याचा प्रयत्न करावा. यासाठी सक्ती करणे योग्य होणार नाही. याबाबत आय.सी.डी.एस अधिकारी यांनी टी.एच.आर.(Take Home Ration) ही योजना राबविण्याची प्रक्रिया सुरु केल्याचे सांगितले. | रेशन किमान ३ महिन्यांसाठी लसीकरण सत्राच्या दिवशी द्यावे. याबाबत योग्य ते आदेश निर्गमित करावे. | मा.आयुक्त, महिलाव बालविकास विभाग |
| ८ | **जन्ममृत्यु नोंदणी स्थिती :-** अंगणवाडी मार्फत होणारी जन्ममृत्युची नोंदणी याबाबतची माहिती महिला व बाल विकास विभाग यांनी समितीला सादर केली नाही. | अंगणवाडी मार्फत नोंदण्यात येणारे जन्ममृत्युचे जिल्हानिहाय प्रमाण नियमितपणे सादर करावे. | मा.आयुक्त, महिलाव बालविकास विभाग |
| ९ | **जिल्हा निहाय रॅकिंग व बाल उपचार शिबीर** राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य पोषण मिशन सार्वजनिक आरोग्य विभागाने व महिला | राज्य शासनाने ही ग्राम बालविकास केंद्राची संकल्पना | मा.आयुक्त, महिलाव |

| | | | |
|---|---|---|---|
| | बालविकास विभागाने केंद्र शासनाच्या निर्णयापूर्वीच सन २००७ मध्ये राज्यात Wasting चा निकष लागू करुन संपूर्ण राज्यात बाल विकास केंद्रे स्थापन केली. याच धर्तीवर राज्यातील ९ ते १० लक्ष एमअेएम व एसअेएम बालकांना प्रा.आ. केंद्र पातळीवर भरती करणे शक्य नसल्याने ग्राम बाल विकास केंद्राची संकल्पना मिशनने केली आहे. त्याची सविस्तर माहिती डॉ. नरेश गिते, संचालक राजमाता जिजाऊ मिशन यांनी दिली. बीड व पुणे जिल्हयामधील पायलट ग्राम बालविकास केंद्रातील बालकांचे श्रेणीवर्धन उत्साह वर्धक असून संपूर्ण राज्यभरात याची अंमलबजावणी करण्याची शिफारस मिशनने महिला व बालविकास विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग यांना केली आहे.<br>मिशनच्या शिफारशीप्रमाणे बालविकास केंद्राचे परिणाम चांगले दिसून आले आहेत. हीच संकल्पना विकेंद्रीत करुन गाव पातळीवर ग्राम बालविकास केंद्राची संकल्पना अत्यंत उल्लेखनिय व अंमलबजावणीस योग्य आहे. मिशननी यांची संक्षिप्त टिप्पणी सर्व सदस्यांना सभेमध्ये दिली. | राज्यभर राबवून एमअेएम / एसअेएम बालकांवर उपचार करावेत व होणारे बालमृत्यु टाळावे यामध्ये ० ते ३ वयोगटास प्राधान्य द्यावे. असा निर्णय घेण्यात आला. डॉ.गिते, राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य पोषण मिशन य यांनी याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे. प्रस्ताव शासन निर्णयाच्या नमुन्यात निर्गमित होईल. सदरील प्रस्ताव विभागामार्फत पाठविण्याऐवजी मुख्य सचिव यांचेकडे पाठवावा. | बालविकास विभाग |
| १० | संचालक मिशन यांनी जागतिक आरोग्य संघटनेचे नवीन निकष खालीलप्रमाणे विषद केले.<br>१) वयाप्रमाणे वजन - Underweight (कमी वजनाची<br>२) वयाप्रमाणे उंची - Stunting (बुटकी)<br>३) उंची / लांबीप्रमाणे वजन - Wasting (लुकडी)<br>या नवीन निकषाप्रमाणे Underweight हा निकष अंगणवाडी पातळीवर लागु करावा आणि Stunting , Wasting<br>हे दोन्ही निकष प्रा.आ.केंद्र स्तरावर वैद्यकिय अधिकारी आणि पर्यवेक्षक स्तरावर लागू करावेत. डॉ.गिते, राजमाता जिजाऊ मिशन व डॉ.मृदुला फडके, यांनी जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कुपोषणाची वर्गवारी परसेन्टेजवर न करता परसेनटाईल यावर करावी. याबाबत चर्चा केली. तसेच डॉ. माईट गोल्ड, या तज्ञ डॉक्टराची व्याख्याने वैदयकिय आरोग्य अधिकारी यांचेसाठी | सर्व संबधिताना याबाबत प्रशिक्षण व माहिती द्यावी. प्रशिक्षण घेणे व नवीन पध्दतीने कुपोषित बालकांची वर्गवारी करणे. याबाबत शासनामार्फत धोरण ठरविणे आवश्यक आहे. | मा.आयुक्त महिला बाल विकास विभाग, राजमाता जिजाऊ बालआरोग्य व पोषण मिशन |

| | | | |
|---|---|---|---|
| | आयोजित करावी. याबाबत डॉ.मृदुला फडके, यांनी सुचविले. | | |
| ११ | **कुपोषणासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालय / उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहीत याचिकांची सद्यस्थिती :**<br>याचिकेबाबतची माहिती आरोग्य सेवा संचालनालयातर्फे डॉ. रानडे सहा.संचालक यांनी समितीला दिली. | प्रत्येक सभेमध्ये सदर याचिकां बाबतच्या प्रगतीबाबत समितीला अवगत करण्यात यावे. | सहाय्यक संचालक, मुंबई |
| १२ | **कुपोषण कमी करण्यासाठी वेगवेगळया विभागाने केलेली कार्यवाही**<br>पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग :- पाणी शुध्दीकरणाबाबत प्रत्येक ग्रामपंचायतीला ५० किट दिलेल्या आहेत. क्लोरोफॉम व ओ.टी टेस्ट करण्याच्या सूचना ग्रामपंचायतीला देण्यात आलेल्या आहेत. केमिकल कन्टॅमिनेशन आढळून आले तर जिल्हा स्तरावरील लॅबला सदर पाणीनमुने पाठविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. | नवसंजीवनी जिल्हयांअंतर्गत प्रत्येक जिल्हयाचे अहवाल मागवून घ्यावेत त्यामुळे पाण्यामुळे होणा-या आजारांच्या प्रमाणाची तुलना करता येऊ शकेल. | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग |
| १३ | **रोजगार हमी योजना :-**<br>रोजगार हमी योजनेअंतर्गत आदिवासी भागातील मजुरांना त्वरीत रोजगार मिळावा यासाठी किमान एक काम नियमित सुरु असते. एक काम पूर्ण झाले की दुसरे काम त्वरीत सुरु करण्यात येते. यासाठी वन विभागामार्फत जास्तीत जास्त कामे सुरु करण्यात येतात. कामाबाबतची दवंडी गावामध्ये देण्यात येते असे रोजगार हमी योजनेचे अधिकारी, यांनी विषद केले.<br>समिती सदस्य यांनी याबाबत ठाणे जिल्हयातील मोखाडा, डहाणू, जव्हार या भागात भेट दिली असता त्या ठिकाणी माहे एप्रिल मे महिन्याचा रोजगार मिळाला नसल्याबाबत मोर्चा काढल्याचे समजले. या दोन महिन्यांच्या रोजगाराबाबत अद्यापही निर्णय झालेला नाही. त्याचप्रमाणे गडचिरोली जिल्हयातील कोची तालुक्यातही मागील वर्षभरात फक्त १५ ते २० दिवसांचा रोजगार उपलब्ध झाला, संपूर्ण वर्षात रोजगार हमी योजनेची कामे मिळाली नाहीत. गडचिरोली जिल्हयातील मजुरांनी ग्रामसभेत कामे सूचवून मागणी केल्याचे समजले परंतु त्या ठिकाणी रोजगार हमी योजनेच्या कामाचे नियोजन व्यवस्थित नसल्याचे निदर्शनास आले आहे. | मजुरांनी ज्या दिवशी कांही काम केले असेल त्या संबंधीची नोंद त्वरीत घेतली जावी जेणेकरुन त्यांना त्या दिवशी पगार नाही झाला व नंतर पगार करण्याची वेळ आली तर त्याचा योग्य तो पगार देण्याची कार्यवाही होऊ शकेल. | मा सचिव, रोजगार हमी योजना मुंबई. |

| | | | |
|---|---|---|---|
| | रोजगार हमी योजनेत काम करणा-या मजुरांची जूनी कार्ड बाद करण्यात आलेली आहेत तथापि नवीन कार्ड देण्यात आले नाही. त्यांना कार्ड पुरविण्यात येवून सदर कार्डावर दैनंदिन कामाच्या नोंदी घेण्यात याव्यात. त्यांचे मस्टरवाचन कायद्याप्रमाणे करणे आवश्यक आहे. कारण सदर मजूर अशिक्षित असतात ते रेकॉर्ड ठेवू शकत नाहीत म्हणून काम संपले की त्याची नोंद संबंधीतांच्या कार्डावर व्हावी व शक्यता पेमेंट चेकद्वारे होणे आवश्यक आहे. जेणेकरुन वेतन पूर्ण व नियमित देणे सोयीचे होईल. रोंजगार हमी योजनेचा आठवडी अहवाल प्राप्त होत नाही. त्याचप्रमाणे नवीन दरानुसार रु. १२० प्रतिदिन वेतन देण्यात येते किंवा कसे याबाबत माहिती सादर करावी. | | |
| १४ | **अन्न व नागरी पुरवठा व ग्राहकसंरक्षण विभाग**<br>दिनांक २७ ऑगस्ट २००९ रोजी महागाईच्या संदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार बीपीएल व अंतोदय शिधा पत्रिका धारक यांचेसाठी अन्नधान्याचे दर निश्चित करण्यात आले आहे. यासाठी पुरेसा म्हणजे १०० टक्के पुरवठा करण्यात येत आहे. असे श्री एकनाथ घागरे कक्ष अधिकारी अन्न व नागरी पुरवठा विभाग यांनी विषद केले.<br>ठाणे जिल्हयातील ब्राम्हणपाडा, डहाणू येथे राशन दुकान प्रदिर्घ कालापासून बंद असल्याने तेथील जनतेला रेशन मिळत नसल्याचे प्रतिपादन केले व अशी परिस्थिती इतर जिल्हयात असून रेशन दुकानावर शासनाच्या निकषानुसार शिधा पोहच होत नसल्याने जनतेस पुरेसा साठा उपलब्ध होत नसल्याची वस्तुस्थिती असल्याचे स्पष्ट केले. | समिती सदस्यांच्या दि. १९ सप्टेंबर रोजीच्या मुंबई भेटीत योग्य ती माहिती देण्यात यावी. पुढील सभेत जिल्हानिहाय किती पुरवठा केला व कधी केला याची माहिती सादर करावी.<br>आदिवासी जिल्हयात विभागामार्फत कुपोषण कमी करण्याचे दृष्टिने करण्यांत आलेली कामे तालुकानिहाय समिती सदस्यांना ईमेल व्दारे आठ दिवसांच्या आत देण्यांत यावी. | अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय मुंबई |
| १५ | आदिवासी विकास विभाग : आदिवासी विकास विभागामार्फत ६ स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. या संस्था नाशिक,अमरावती,नंदुरबार, गडचिरोली या जिल्हयात आहेत या संस्थांना २ कोटी रु. अनुदान सन २००७ मध्ये वितरीत करण्यात आले होते. या संस्थांमार्फत कुपोषण, बालमृत्यु नवजात अर्भक सेवा इ. कामकाज करण्यात येते, असे अवर सचिव आदिवासी विकास विभाग यांनी नमूद केले. या सर्व संस्थांना कमिटीचे सदस्य भेटी देणार असून त्यावेळी समिती सदस्यांना योग्य ती वस्तुनिष्ठ | आदिवासीजिल्हयात वभागामार्फत कुपोषण कमी करण्याचे दृष्टिने करण्यांत आलेली कामे तालुकानिहाय समिती सदस्यांना ईमेल व्दारे आठ दिवसांच्या आत देण्यांत यावी.<br>समिती सदस्यांना भेटीच्या वेळी संस्थांनी केलेल्या कार्याचा, त्यांना पाहणीत आढळून आलेले मुद्दे व त्यांनी सूचविलेल्या | सचिव, आदिवासी विकास विभाग मंत्रालय मुंबई |

| | | | |
|---|---|---|---|
| | माहिती देण्यात यावी. | उपाययोजना यासंबंधीचा पूर्ण अहवाल आरोग्य विभागाला सादर करावा, जेणेकरुन त्या आधारे आरोग्य विभाग योग्य ती कार्यवाही करु शकेल.<br>या सहा संस्थांनी बालकांमधील कुपोषण कमी करण्याचे दृष्टीने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालक आरोग्य सेवा मुंबई व राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांना सादर करावा. | |
| १६ | **<u>कुपोषण संनियंत्रण समितीने घेतलेले महत्वाचे निर्णय</u>**<br>१) दिनांक १९ सप्टेंबर रोजी श्री. बलदेवसिंग, सचिव, अन्न व नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण विभाग व रोजगार हमी योजना विभागाच्या सचिवांची मंत्रालय मुंबई येथे समितीचे सदस्य श्रीमती श्रीराज प्रभु, श्रीमती मेघा कुलकर्णी, श्री. भिम रासकर हे भेट घेणार असल्याचा निर्णय घेण्यात आला. सदर भेटीत अेपीएल व बीपील तसेच अंतोदय योजनेत किती कोटा वाटप करण्यात येतो याबाबतची माहिती समितीला देण्यात यावी. तसेच रोजगार हमी योजने अंतर्गत उपलब्ध रोजगारांची व मजुरांना प्रलंबित असलेल्या वेतनांची माहिती देण्यात यावी. बैठकीस उपस्थित असलेल्या सदर विभागाच्या प्रतिनिधींनी मा.सचिवांना याबाबत अवगत करावे. | डॉ.भिम रासकर, यांनी भेट दिलेली आहे. भेटीचा अहवाल समितीला दिलेला आहे. याबाबत पाठपुरावा बैठक घेण्यात यावी. | सचिव, रोजगार हमी योजना व सचिव अन्न व नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय मुंबई. |

| | | | |
|---|---|---|---|
| | २) राज्यातील कुपोषित बालकांच्या बालमृत्यु संदर्भात संनियंत्रण समितीच्या सदस्यांनी विविध जिल्हयांना भेटी देवून विविध विभागांनी याबाबत जिल्हास्तरावर राबवित असलेल्या योजनांचा व केलेल्या कामाचा आढावा घ्यावा असे डॉ. रजनीकांत आरोळे समिती अध्यक्ष यांनी सूचित केले.त्यानुसार समिती सदस्यांना खालीलप्रमाणे जिल्हयांचे वाटप करण्यात आले.<br>१)डॉ. रजनीकांत आरोळे- अहमदनगर, बीड<br>२) श्री. भिम रासकर - रायगड, लातुर<br>३) श्रीमती श्रीराज प्रभु - ठाणे<br>४)डॉ.सतिश गोगुलवार-गडचिरोली, अमरावती<br>५) डॉ.श्याम अष्टेकर - नाशिक , नंदुरबार<br>६) श्रीमती मेघा कुलकर्णी - मुंबई.<br>डॉ.भिम रासकर यांनी नंदुरबार जिल्हयास भेट दिली. त्यांनी जांभुळपाडा, प्राथमिक आरोग्य केंद्राचे काम चांगल्यारीतीने सुरु असल्याचे सांगितले. तसेच लातूर जिल्हयातील भेटीचा अहवाल संक्षिप्त स्वरुपात सांगितला. डॉ.आरोळे यांनी बीड जिल्हयामध्ये दिलेल्या भेटीचा अहवालाबाबत चर्चा केली. | उपरोक्त समिती सदस्यांनी भेटी दिलेल्या आहेत. डॉ.भिम रासकर व डॉ.आरोळे समिती अध्यक्ष यांनी अहवाल समितीकडे सूपूर्त केले आहेत. | संचालक, आरोग्य सेवा,मुंबई<br><br>संबंधीत समिती सदस्य |
| | ४) गंभीर व दूर्धर आजारी बालकांवरील उपचार / शस्त्रक्रिया याबाबत विशिष्ट कार्यपध्दतीचा शासन निर्णय असणे आवश्यक आहे. राज्यातील प्रत्येक बालकाच्या आरोग्याचा प्रश्न असल्याने प्रा.आ.केंद्र, ग्रामीण रुग्णालय उपजिल्हा रुगणालय आणि जिल्हा रुग्णालय या ठिकाणी करण्यात येणारे उपचार याबाबत मार्गदर्शक सूचना निश्चित केलेलया असाव्यात. या आरोग्य संस्थांमध्ये उपचार होऊ शकले नाहीत तर सुपर स्पेशालीटी हॉस्पीटल / वैद्यकिय कॉलेज यांच्या जबाबदा-या काय आहेत याबाबत सुध्दा निर्देश असावेत. आरोग्य तपासणी आणि उपचार करणे, आरोग्य सेवा पुरविणे , सर्व संबंधीत अधिका-यांच्या कर्तव्य व जबाबदा-या निश्चित करणे यासाठी शासन निर्णय काढावा असे मा.अध्यक्ष यांनी निर्देश दिले. | आरोग्य विभागाने महिला व बालविकास विभाग आणि राजमाता जिजाऊ आरोग्य व पोषण मिशन यांच्या सहयोगाने चर्चा करुन शासन निर्णय निर्गमित करावा. या पध्दतीने या आठवडयात सभा घ्यावी. | सहसंचालक रुग्णालये, मुंबई, |
| १७ | एप्रिल २००८ मध्ये कुपोषण सनियंत्रण समितीने शासनाला अंतरिम शिफारसी सादर केल्या आहेत. शिफारसींवरील बहुतांश मुद्यांवर करण्यात आलेली कार्यवाही फारशी समाधानकारक नसल्याचे सदस्यांनी सुचीत केले. | सदस्य सचिवांनी संबधित विभाग प्रमुखांशी संपर्क साधुन समिती सदस्यांच्या भावना कळवाव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील सभेमध्ये ठेवावा. | संचालक आरोग्य सेवा, मुंबई. |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | नगर विकास विभाग व वैद्यकिय शिक्षण व संशोधन विभागाचे अधिकारी अथवा प्रतिनिधी बैठकीस उपस्थित नव्हते. सदर सभेस वैद्यकिय शिक्षण व संशोधन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. | सभेस वैद्यकिय शिक्षण व संशोधन विभागाचे अधिकारी उस्थित होते. त्यांना अतिगंभीर आजारावर उपचारासाठी वैद्यकिय महाविदयालयाच्या रुग्णालयांत येणाऱ्या अंगणवाडीतील मुलांना तपासणीचेवेळी प्राधान्य देणेबाबत पत्र सर्व वैद्यकिय महाविदयालयांत देणेबाबत सूचना केल्या आहेत. | वैद्यकिय शिक्षण व संशोधन विभाग |
| १९ | मा.अध्यक्षांचे परवानगीने इतर विषय / पुढील सभेची तारीख निश्चित करणे.<br>पुढील सभा दिनांक ३ डिसेंबर २००९ रोजी आरोग्य भवन मुंबई येथे घेण्याचे निश्चित करण्यात आले. | सभेच्या पुढील तारखेबाबत समिती सदस्यांना कळविण्यात आले. | संचालक आरोग्य सेवा, मुंबई. |
| २० | ब-याचश्या विभांगामार्फत कुपोषण कमी करण्याच्या दृष्टीने चांगली कामे केली जातात. "महान" या मुंबईतील संस्थेस पुढील सभेस बोलविण्याबाबत समिती सदस्यांनी सुचविले. | विविध विभागांनी ुपोषणासंदर्भात केलेल्या चांगल्या कामांची माहिती पोर्टलवर टाकण्यासाठी श्रीमती मेधा कुलकर्णी यांचेकडे द्यावी. | संबंधित विभाग |
| २१ | याप्रमाणे दिनांक१७-०९-२००९ रोजीच्या सभेच्या इतिवृत्तावरील कार्यवाहीचे वाचन झाले. | इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यात आले. | |
| विषय क्रमांक २ | अंगणवाडीतील मुलांची तिमाही तपासणी / ग्रेड ३ व ४ च्या मुलांचा उपचार / अतिगंभीर मुलांवरील उपचार, नवसंजीवनी आढावा. सदर योजनांचा माहे नोव्हेंबर २००९ अखेरीचा आढावा देण्यात आला. | प्रत्येक सभेमध्ये अद्ययावत माहिती सादर करवी. | अतिरिक्त संचालक (कु.क.), पुणे |
| विषय क्रमांक ३ | जिल्हयातील अर्भक मृत्यू / बालमृत्यू नोंदणीची स्थिती आणि बालमृत्यूच्या कारणांचे विश्लेषण. सदर योजनांचा माहे नोव्हेंबर २००९ अखेरीचा आढावा देण्यात आला. याबाबत नियमित चर्चा व्हावी असे ठरले. | प्रत्येक सभेमध्ये अद्ययावत माहिती सादर करवी. | अतिरिक्त संचालक (कु.क.), पुणे |
| विषय क्रमांक ४ | अंगणवाडी, मिनी अंगणवाडी स्थापनेची सद्यस्थिती व गरज. | पुढील सभेस माहिती सादर करवी. | महिला बाल विकास विभाग |
| विषय क्रमांक ५ | अंगणवाडी मुलांची उपस्थिती / वजन घेणे / कुपोषणाची सद्यस्थिती (० ते ३ व ३ ते ६ वर्ष वयोगट स्वतंत्ररीत्या) | पुढील सभेमध्ये अद्ययावत माहिती सादर करावी | महिला बाल विकास विभाग |
| विषय क्रमांक ६ | जन्म-मृत्यू नोंदणी स्थिती. | प्रत्येक सभेमध्ये अद्ययावत माहिती सादर करणे. | महिला बाल विकास विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| विषय क्रमांक ७ | जिल्हानिहाय रॅकिंग.<br>डॉ. गीते यांनी जिल्हानिहाय रॅकिंगबाबत समिती सदस्यांना माहीती दिली. | प्रत्येक सभेस माहिती सादर करणे | राजमाता जिजाऊ माताबाल व आरोग्य पोषण मिशन |
| विषय क्रमांक ८ | बाल उपचार शिबीर.<br>डॉ. गीते यांनी बालउपचार शिबीराची सद्यस्थिती सादर केली. | प्रत्येक सभेचेवेळी सद्यस्थितीची माहिती सादर करणे . | राजमाता जिजाऊ माताबाल व आरोग्य पोषण मिशन |
| विषय क्रमांक ९ | कुपोषण संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालय / उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिकांची सद्यस्थिती.<br>डॉ. रानडे यांनी न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचीकेची सद्यस्थिती समिती सदस्यांना सादर केली. | प्रत्येक सभेचेवेळी सद्यस्थितीची माहिती सादर करणे ो . | ➢ महिला बाल विकास विभाग<br>➢ आदिवासी विकास विभाग<br>➢ आरोग्य विभाग |
| विषय क्रमांक १० | कुपोषण कमी करण्यासाठी वेगवेगळया विभागाने केलेली कार्यवाही. संबंधित विभागांनी माहीती सादर केली. | प्रत्येक सभेचेवेळी सद्यस्थितीची माहिती सादर करणे . | ➢ पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग<br>➢ रोजगार हमी योजना<br>➢ अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग<br>➢ आदिवासी विकास विभाग<br>➢ नगर विकास विभाग<br>➢ वैद्यकिय शिक्षण व संशोधन<br>राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान |

| | | | |
|---|---|---|---|
| विषय क्रमांक ११ | कुपोषण संनियंत्रण समितीने केलेल्या अंतरिम शिफारसीवरील कार्यवाही अहवाल. संबंधित विभागांनी माहीती सादर केली. | पुढील सभेस माहिती सादर करणे. | सर्व विभाग |
| विषय क्रमांक १२ | आजवरच्या संनियंत्रण समितीच्या निर्णयावर विविध विभागांनी केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल . संबंधित विभागांनी माहीती सादर केली. | घेण्यात आलेल्या निर्णयासंबंधी पाठपुरावा करावा. | सर्व विभाग |
| विषय क्रमांक १३ | मा. अध्यक्षांच्या परवानगीने इतर विषय - पुढील सभेची तारीख निश्चित करणे.. संबंधित विभागांनी माहीती सादर केली. | मा. अध्यक्ष डॉ. रजनीकांत आरोळे यांचे सहमतीने पुढील सभेची तारीख निश्चित करावी. | संचालक आरोग्य सेवा, मुंबई. |